हिंदु संघटन आणि हिंदु राष्ट्राच्या स्थापनेसाठी कार्यरत

# हिंदु जनजागृति समिति

नोंदणी क्र. : 1540/I-634, १२.११.२००२, फोंडा, गोवा.

भ्रमणध्वनी
९३२६१०३२७८
ई-मेल
contact@HinduJagruti.org
संकेतस्थळ
www.HinduJagruti.org

नोंदणीकृत कार्यालय : 'मधु स्मृति', घर क्र. ४५७, पहिला मजला, बैठक सभागृह, सत्यनारायण मंदिराजवळ, ढवळी, फोंडा, गोवा ४०३ ४०१.

प्रती,
**माननीय संपादक / मुख्य वार्ताहर,**

दिनांक : २७.१२.२०१४

**<u>कृपया प्रसिद्धीसाठी !</u>**

<u>पीके चित्रपटाविषयीच्या विधानाने हिंदुत्ववाद्यांचे खच्चीकरण करण्याचा प्रकार !</u>

## आडवाणींच्या डोक्यावर अजूनही जीनांचे भूत ! - हिंदु जनजागृती समिति

भाजपचे ज्येष्ठ नेते लालकृष्ण अडवाणी यांनी पीके या चित्रपटाची भलावण करतांना हा चित्रपट अत्यंत अद्भुत आणि धाडसी आहे, जास्तीतजास्त लोकांनी तो नक्की पहायला हवा, असे मत व्यक्त केले आहे. पीकेच्या माध्यमातून चाललेली हिंदु देवता आणि धार्मिक कृती यांची थट्टा रोखण्यासाठी हिंदुत्ववादी संघटना प्राणपणाने विरोध करत असतांना अडवाणी यांनी असे विधान करून हिंदुत्ववाद्यांचे खच्चीकरणच केले आहे; म्हणून पीके या हिंदुद्रोही चित्रपटाचा उदोउदो करणाऱ्या लालकृष्ण अडवाणींचा हिंदु जनजागृती समिती जाहीर निषेध करते.

अडवाणी यांचे हिंदुत्वाच्या कार्यातील योगदान निश्चितच चांगले वाटत होते; तसेच वयोमानाने अडवाणी यांचा आदर ठेवावा, असे असले, तरी आमच्यासाठी धर्म हा त्यांच्यापेक्षा अनंतपटीने श्रेष्ठ आहे. काही वर्षांपूर्वी त्यांनी जीनांच्या कबरीवर डोके टेकवून जी वादग्रस्त व देशप्रेमींची भावना दुखावणारी विधाने केली, त्या वेळी त्यांच्या डोक्यात गेलेले जीनांचे भूत अजूनही उतरलेले नाही, याचीच प्रचीती आता येत आहे. अडवाणी यांना दूर सारून त्यांच्या जागी मोदींची निवड करण्यात आली, हे काळानुसार सुसंगत झाले असेच आता म्हणावे लागेल !

आपला नम्र,

श्री. रमेश शिंदे,
राष्ट्रीय प्रवक्ता, हिंदु जनजागृती समिती
(संपर्क : ०९९८७९६६६६६)